**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ 6587 /२०२४      दिनांक :- १[illegible] / ०९ /२०२४

-: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- <u>नो पार्कीग व पी.एम.पी.एल (PMPL BUS) बसेस करीता पर्यायी मार्ग</u>

पुणे शहरात दिनांक १७/०९/२०२४ रोजी श्री. गणेश विसर्जनाची मिरवणूक सकाळी ०९.०० वा. सुमारास निघणार असल्याने नागरीक मोठया संख्येने मिरवणूक पाहण्यासाठी एकत्र येत असतात. नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व सोयीसाठी तसेच गणेश विसर्जन मिरवणूक शांततेने, सुरळीत व सुरक्षित पार पडावी तसेच वाहतुक सुरक्षीत व सुरळीत रहावी याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका, गणेश विसर्जन मिरवणुकीतील रथ इ.) खेरीज करुन पी.एम.पी.एल करीता मनपा परिसरामध्ये वाहतूकी मध्ये तसेच सर्व प्रकारच्या वाहनांच्या नो पार्कीग बाबत **दि. १७/०९/२४ व १८/०९/२४ रोजी** खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**<u>नो पार्कीग व पी.एम.पी.एल. (PMPL BUS) बसेस करीता मार्ग</u>**

**१. झाशी राणी चौक ते तोफखाना पर्यत कॉग्रेस हाऊस रोडवर रस्त्याच्या दोन्ही बाजुस सर्व प्रकारचा वाहनांना नो पार्कीग करण्यात येत आहे.**

**२. पी.एम.पी.एल (PMPL BUS) बसेस करीता म.न.पा भवन बस स्टॅण्ड साठी मार्ग :-**

**अ) स.गो.बर्वे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक ते मंगल सीनेमा समोरुन पुणे मनपा भवन व**

**ब) पुणे मनपा भवन ते खूडे चौक उजवीकडे वळण घेवून मनपा समोरुन प्रिमीयर गॅरेज चौक डावीकडे वळण घेवून स.गो.बर्वे अंडरपास मधून सिमला ऑफीस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.**

तरी नागरिकांनी वरील प्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

<u>प्रत</u>:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर